# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१

फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

Eail ID :- mscepune@gmail.com


जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ.३(२४)२०२१/ 2049

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१,

दिनांक :- 12/०७/२०२१.

**प्रति,**

सर्व प्राचार्य / संस्थाचालक

महाराष्ट्र व गोवा राज्य

**विषय :- शासकीय वाणिज्य शिक्षण संस्था सुरू करण्यास परवानगी देणे बाबत.**

**संदर्भ :-१) महाराष्ट्र शासनाचे दि.०४.०६.२०२१ च्या मार्गदर्शन सूचना.**

**२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.०७/०७/२०२१ रोजीचे शासन परिपत्रक.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कोवीड १९ या कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे शासनाने संचारबंदी लागू केल्याने महाराष्ट्रातील सर्व शैक्षणिक संस्था बंद करण्यात आल्या होत्या.

उपरोक्त संदर्भिय शासन पत्रान्वये दि.०४ जून २०२१ पासून संचारबंदीत शिथिलता दिली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन परिपत्रकान्वये कोविड मुक्त क्षेत्रातील शैक्षणिक संस्था सुरू करणेस परवानगी दिली आहे. शासकीय वाणिज्य संस्थांनी (संगणक टायपिंग, मॅन्युअल टायपिंग, लघुलेखन) पुढील अटींच्या अधिन राहुन कार्यवाही करावी. वाणिज्य शैक्षणिक संस्थांना दिनांक १५ जुलै २०२१ पासून संस्था सुरू करणेस परवानगी देण्यात येत आहे.

१. स्थानिक प्रशासन, जिल्हाधिकारी, तहसीलदार तसेच आपत्ती व्यपस्थापन समितीच्या आदेशाचे वेळोवेळी पालन करावे लागेल. तसेच संस्था सुरू करणेसाठी स्थानिक प्रशासनाची योग्य ती परवानगी घेऊन तसेच त्या त्या क्षेत्रात लागू असलेल्या निर्बंधानुसार संस्था सुरू करणेची कार्यवाही करावी.

२. महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारीत नियमावली, २०१६ तील प्रकरण २ मधील मुद्दा क्र.११.२ नुसार सरावासाठी १२ X १२ चा हॉल ठेवून प्रत्येक संगणक / टंकलेखन यंत्रात किमान ७ चौरस फूट या प्रमाणात जागेची सोय करावी लागेल.

३. प्रत्येक विद्यार्थ्याचे हॉल प्रवेशाचे वेळी सॅनीटाईज करावे. साबणाने हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था करावी. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याचे व सर्व संबंधितांचे थर्मल स्कॅनिंग करावे.

४. दोन बॅचेस मधे अर्धा तास अवकाश ठेवून प्रत्येक वेळी हॉल स्वच्छ व संगणक व टंकलेखन सॅनिटाईज करावीत.

५. महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारीत नियमावली, २०१६ तील प्रकरण २ मधील मुद्दा क्र.११.७ नुसार कोवीड १९ ची लक्षणे असणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश देवू नये.

६. शासन निर्धारीत फी पेक्षा जास्त फी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येवू नये.

७. शक्यतो उमेदवाराने हॅण्डग्लोजचा वापर करावा. मास्क लावणे बंधनकारक राहील.

८. हॉलमध्ये किमान ०५ ते ०८ उमेदवार व ०१ इंस्ट्रक्टर (अध्यापक) शिवाय इतरांना प्रवेश निषिध्द करावा.

९. विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा दूरध्वनी क्रमांक घेवून नेहमी संपर्क करावा. तसेच जिल्हा व तालुका, प्रशासन आरोग्य विभागाचा संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावण्यात यावा. कोवीड १९ च्या प्रार्दुभाव रोखण्यासाठीच्या आरोग्य विभागाच्या दिलेल्या सूचना दर्शनी भागात लावाव्यात व त्या सूचनांचे पालन होईल यादृष्टीने कार्यवाही करावी.

१०. संस्थाचालकांनी सर्व व्यवहार ऑनलाईन करावे. प्रवेशाचा कालावधी १५ जून २०२१ ते १५ जुलै २०२१ पर्यंत असा निश्चित केलेला आहे. त्याप्रमाणे विद्यार्थी प्रवेशाची कार्यवाही ऑफलाईन / ऑनलाईन पध्दतीने करावी.

११. शक्यतो स्थानिक उमेदवारांनाच प्रवेश द्यावा.

१२. प्रत्येक विषयासाठी (संगणक, टंकलेखन, लघुलेखन) स्वतंत्र बैठक व्यवस्था असावी.

१३. विद्यार्थ्यांच्या कुटुंबात अथवा निवासस्थान परीसरात कोवीड १९ चा रूग्ण नसल्याची खात्री करावी. तसे हमीपत्र संबंधित विदयार्थ्यांकडून घेणे बंधनकारक आहे.

१४. प्रत्येक संस्थाचालकांने व सर्व विद्यार्थ्यांसहित संबंधित सर्वांनी आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करणे बंधनकारक करावे.

१५. प्रत्येक उमेदवाराचे आरोग्य कार्ड तयार करून शारिरीक तापमान, सर्दी-खोकला यांच्या दैनंदिन नोंदी घेण्यात याव्यात.

१६. कोवीड १९ च्या नियमानुसार संस्थेच्या विद्यार्थी क्षमतेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना एक दिवसाआड विभागून विद्यार्थ्यांचे ८० % उपस्थिती पूर्ण करून म्हणजेच ६० % तास अशी पूर्ण होण्याची कार्यवाही करावी.

१७. जानेवारी २०२१ ते जून २०२१ या सत्रातील विद्यार्थ्यांचे राहिलेले तास पूर्ण होतील या दृष्टीने नियोजन करावे.

१८. उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये निर्गमित झालेल्या व वेळोवेळी शासन स्तरावरून निर्गमित शासन परिपत्रकातील सूचनांचेही पालन करणे सर्व संस्थांना बंधनकारक राहिल. याबाबत काही त्रुटी आढळल्यास संबंधित संस्था जबाबदार राहिल व नियमानुसार संबंधित संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-१**

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादरः</u>**

**१) मा.अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई ३२**
**२) मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**<u>प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठीः</u>**

**१) विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व.**
**२) शिक्षणाधिकारी (माध्य),जिल्हा परिषद सर्व.**